# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११७१३/२१/अ.क्र.४३३/२५/०१

**श्री. मेहमूद मेहबूब शेख**
रुम नं. ७, दोस्त मोहम्मद चाळ,
गौसीया मस्जिद मागे, नित्यानंद नगर,
घाटकोपर (प) मुंबई – ४०० ०८६.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प. ज. वा.) एस विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भु.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प. ज. वा.) पू.उ. परि-६**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवार इमारत, ५वा मजला,न.भु.क्र. ११९/ब, अण्णाभाऊ गोडबोले मार्ग,
कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई - ४०००४२

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.१०.२०२० | - | ११.०१.२०२१ | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.१०.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "Xerox Copies of work order" अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.
त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. ११.०१.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती प्राप्त झाली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नसून आदेश पारित केले नाही.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. ०५.०४.२०२१ रोजी "Order Copy not received", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी उपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एस विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे.

सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना यापुर्वीच प्रदान झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Maharashtra

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**